गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १४१ ● रविवार २१ मे २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 141 | Date : 21/05/2023 | blow :Sunrday | Page 4 | Price 4

## उन्हाचा झळ बसणार!
## पुढील तीन दिवस तापमान वाढणार

पुणे : महाराष्ट्रासह देशात पुढील तीन दिवस तापमानाचा पारा आणखी वाढणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. विदर्भ, मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत तापमान ४० अंश सेल्सियसपेक्षा जास्त आहे. यात आणखी भर पडल्यास उष्माघाताशी संबंधित आरोग्य तक्रारी वाढू शकतात, असा इशारा तज्ज्ञांनी दिला असून काळजी घेण्याचं आवाहन केलं आहे. भारतीय विभागाच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील इतर अनेक शहरांमध्येही ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानाची नोंद झाली आहे.

महाराष्ट्रात गुरुवारी कमाल तापमानाची नोंद झाली असून वर्धा येथे सर्वाधिक कमाल ४३ अंश सेल्सिअस आणि बुलढाणा येथे सर्वात कमी किमान तापमानाची नोंद झाली आहे. भारतीय हवामान खात्याच्या (IMD) आकडेवारीनुसार



अकोला येथे ४२.६ अंश सेल्सिअस, अमरावती ४२.६, बुलढाणा ३९.७, ब्रम्हपुरी ४१.२, चंद्रपूर ४२.४, गडचिरोली ४२, गोंदिया ४१.२ आणि नागपूर ४२.२ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.

देशातील हवामानात सतत चढ-उतार होताना दिसत आहे. कुठे ऊन तर कुठे पाऊस अशी परिस्थिती पाहायला मिळत आहे. हवामान विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, आज देशातील बहुतांश राज्यांचे तापमान ४२ अंश सेल्सिअस ते ४५ अंशांच्या दरम्यान नोंदवलं जाऊ शकतं. हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार राजधानी दिल्लीसह देशातील बहुतांश राज्यांमध्ये हवामान स्वच्छ राहील. यासोबतच काही राज्यांमध्ये उष्णता वाढण्याची शक्यता असून याबाबत अलर्टही जारी करण्यात आला आहे.

हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, शनिवार, २० मे रोजी दिल्लीचे कमाल तापमान ४१ अंश सेल्सिअस आणि किमान तापमान २४ अंश सेल्सिअस राहण्याचा अंदाज आहे. दुसरीकडे, राष्ट्रीय राजधानीतील कमाल तापमान शुक्रवार, १९ मे रोजी ३८.२ अंश सेल्सिअस नोंदवले गेलं. राजस्थानमध्ये काही ठिकाणी कमाल तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या वर राहण्याचा अंदाज आहे. जयपूर, दौसा, अलवर, भरतपूर, करौली जिल्हे आणि आसपासच्या भागात जोरदार उष्ण वारे वाहू शकतात.

गेल्या काही आठवड्यांपासून देशभरात सतत कडक ऊन पडतंय. राष्ट्रीय राजधानीसह देशातील अनेक राज्यांमध्ये सकाळपासून रात्री उष्ण वाऱ्यांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे लोकांच्या अडचणीही वाढत आहेत. हवामान विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, देशातील अनेक भागांत तापमान ४० अंश सेल्सिअसवर पोहोचलं आहे. तसेच, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी देशातील बहुतांश भागात पावसाची शक्यता आहे.

## सिद्धरामय्या यांनी घेतली कर्नाटकच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ
### डीके शिवकुमार उपमुख्यमंत्रिपदी विराजमान

कर्नाटक : कर्नाटकात काँग्रेसच्या विजयानंतर कर्नाटकात सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. तसेच डीके शिवकुमार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. यावेळी राज्यपालांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या शपथविधीला देशभरातील राजकीय नेते उपस्थित आहे. सिद्धरामय्या यांनी दुसऱ्यांदा कर्नाटकचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे.



सिद्धरामय्या यांनी आज कर्नाटकमध्ये मुख्यमंत्री आणि डीके शिवकुमार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. याशिवाय अनेक आमदारांनाही कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. हा शपथविधी सोहळा बंगळुरुच्या कांतीराव स्टेडियमवर पार पडत आहे. १३ मे रोजी कर्नाटक विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. काँग्रेसने १३५, भाजपने ६६ आणि जेडीएसने १९ जागा जिंकल्या होत्या. काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रीपदाच्या दाव्यावरुन सिद्धरामय्या आणि डीके शिवकुमार यांच्यातील वाद अनेक दिवस सुरुच होता. मात्र, पक्षातील वरिष्ठांच्या झालेल्या बैठकीनंतर यावर तोडगा काढण्यात आला. त्यानंतर आज अखेर शपथविधी सोहळा पार पडत आहे.

यावेळी शपथविधीच्या कार्यक्रमात विरोधकांची एकजूट दिसून आली. तर या सोहळ्यात विरोधी पक्षांचे १० हून अधिक महत्वाचे नेते उपस्थित असल्याचे पाहायला मिळत आहे. ज्यात महबूबा मुफ्ती (पीडीपी), नीतीश कुमार (जेडीयू), तेजस्वी यादव (आरेजेडी), डी राजा और सीताराम येचुरी (लेफ्ट), एमके स्टालिन (डीएमके), शरद पवार (एनसीपी), फारुक अब्दुल्ला (नेशनल कांग्रेस), कमल हासन (मक्कल नीधि माईम) उपस्थित आहे.

सिद्धरामय्या आणि डीके शिवकुमार यांचा शपथविधी सोहळा पार पडत आहे. सिद्धरामय्या कर्नाटकचे । पान २ वर

## जगासाठी उत्कृष्ट शिक्षक घडवून भारताने विश्वगुरु व्हावे : राज्यपाल रमेश बैस

मुंबई : आज जगातील अनेक देशांना चांगल्या शिक्षकांची आवश्यकता आहे. भारताने संपूर्ण जगाकरिता उत्कृष्ट शिक्षक घडवून खऱ्या अर्थाने विश्वगुरु व्हावे, असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे केले.

मुंबईतील सिंगापूर इंटरनॅशनल स्कुल मुंबई या संस्थेच्या २०२३ वर्गाचा पदवीदान समारंभ राज्यपाल बैस यांच्या मुख्य उपस्थितीत संस्थेच्या दहिसर मुंबई येथील शैक्षणिक संकुलात शनिवारी (दि. २०) संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

सध्याच्या ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेमध्ये देशाला मोठ्या प्रमाणात अभियंते, व्यवस्थापक, सीए, कंपनी सचिव, अधिकारी, कुशल कामगार व तंत्रज्ञांची आवश्यकता आहे. परंतु त्याहीपेक्षा



देशाला चांगले नागरिक घडवणाऱ्या उत्तम शिक्षकांची गरज आहे, असे सांगून मेधावी स्नातक विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेतल्यानंतर शिक्षक बनण्याचा देखील पर्याय निवडावा असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ बाबासाहेब आंबेडकर आदी राष्ट्रीय नेत्यांनी । पान २ वर

## वारकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घ्या

पुणे : येत्या काहीच दिवसात आषाढी वारीला सुरुवात होणार आहे. १० जूनला संत ज्ञानेश्वरक महाराजांच्या पालखीचं प्रस्थान होणार आहे तर ११ जूनला संत तुकाराम महाराजांच्या पालखीचं प्रस्थान होणार आहे. या पालखी सोहळ्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून तयारी सुरु झाली आहे. त्यातच जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी हवेली तसेच पुरंदर तालुक्यातून जाणाऱ्या पुणे-सासवड-जेजुरी-नीरा या पालखीमार्गाला आणि पालखी तळ, विसाव्यांच्या ठिकाणांना भेटी देऊन तेथील तयारीच्या अनुषंगाने आढावा घेतला.

वारकऱ्यांना कोणत्याही असुविधांना तोंड द्यावे लागू नये याची दक्षता प्रशासनाने घ्यावी. पालखीमार्गावर आरोग्य सुविधा, पुरेसा औषध साठा, फिरत्या शौचालयांची व्यवस्था, पाणी, वीज आदी सर्व सुविधा प्राधान्याने पुरवण्यात याव्यात. दरवर्षीपेक्षा एक महिना अगोदर पालखीचे प्रस्थान होणार असल्याने उन्हाचा त्रास वारकरी भाविकांना होऊ नये यासाठी आवश्यक त्या औषधांची व्यवस्था ठेवावी, पुरेसे पिण्याचे पाण्याचा पुरवठा करण्यास प्राधान्य द्या, असे निर्देश त्यांनी दिले.

पालखीमार्गाच्या साईडपट्ट्या भरुन घेण्यासह खड्डे तसेच पाणी साचणाऱ्या ठिकाणी मुरूम आणि अन्य पर्यायांचा



वापर करुन डागडुजी करावी. पालखी विसावा, मुक्काम असलेल्या गावातील पिण्याच्या पाणी योजनांसाठी अतिरिक्त राखीव पंप ठेवावेत. टँकर वाढवावेत. ऐनवेळी तांत्रिक अडचणी येऊ नयेत म्हणून पर्यायी व्यवस्था तयार ठेवावी. मार्गात आवश्यक तेथे पाण्याच्या टाक्या ठेवाव्यात. दिवे घाटाचा टप्पा पार केल्यानंतर झेंडेवाडी विसाव्याच्या ठिकाणी वारकऱ्यांना मोठा विसावा घ्यावा लागतो. त्या ठिकाणी वारकऱ्यांना विसावा घेता यावा यासाठी पुरेशी जागा उपलब्ध व्हावी म्हणून प्रशासनाने शेजारील खासगी जमीनधारकांशी संपर्क साधून व्यवस्था करावी.

सासवड पालखीतळाची उंची वाढवण्याचे काम झाल्यामुळे पावसाचे पाणी साठण्याच्या अडचणीवर मात करणे शक्य झाले आहे. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी वीजपुरवठा सुरळीत राहील याकडे लक्ष द्या. पर्यायी व्यवस्था म्हणून जनरेटर ठेवावेत, । पान २ वर

## नोटबंदीसारखे निर्णय देशाला परवडणारे नसतात : राज ठाकरे




नाशिक : भारतीय रिझर्व्ह बँकेने बाजारातून २००० रुपयांच्या नोटा मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत नोटा वापरता येणार असल्याचे आरबीआयने म्हटले आहे. या निर्णयावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नोटबंदीसारखे निर्णय देशाला परवडणारे नसतात, असं राज ठाकरे म्हणाले.

भारतीय रिझर्व्ह बँकेने चलनातून दोन हजार रुपयांच्या नोटा मागे घेण्याची घोषणा काल (१९ मे) केली. यावर राज ठाकरे यांना विचारलं असता ते म्हणाले की, हा धरसोडपणा आहे. तज्ज्ञांना विचारुन हा निर्णय झाला असता तर ही वेळ आली असती. कधीही गोष्ट आणायची, कधीही बंद करायची, त्यावेळी जेव्हा नोटा आणल्या होत्या तेव्हा त्या । पान २ वर

## नवेगाव-नागझिरा पर्यटकांचे आकर्षण केंद्र बनेल : वनमंत्री सुधीर मुनगंटीवार

गोंदिया : संशोधन, पर्यटन, संवर्धन व ईन ब्रिडिंग या चार मुद्यांवर आधारित कार्य वनविभागाने हाती घेतले असून त्या अंतर्गत आज नवेगाव-नागझिरा अभयारण्यात वाघिणीचे स्थानांतरण करण्यात आले. नैसर्गिक अधिवासासाठी येथील जंगल उपयुक्त आहे. वाघिणीच्या आगमनामुळे नवेगाव नागझिरा



अभयारण्य वन्यजीव प्रेमी, अभ्यासक व पर्यटकांचे आकर्षण केंद्र बनेल असा विश्वास वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प नैसर्गिक अधिवासासाठी उत्तम ठिकाण असून आज सोडण्यात आलेल्या वाघिणींच्या प्रजननातून वाघांची पुढील पिढी दर्जेदार निर्माण होण्यास सहाय्यभूत ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.ब्रम्हपुरी भूभागातून आणण्यात आलेल्या वाघीण नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात आज वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत सोडण्यात आल्या. या कार्यक्रमानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. खासदार सुनील मेंढे, अशोक नेते, आमदार विजय रहांगडाले, मनोहर चंद्रिकापुरे, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महिप गुप्ता, मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक रंगनाथ नाईकडे, मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक ताडोबा अंधारी प्रकल्प डॉ. रामगावकर, विशेष पोलीस महासंचालक संदीप पाटील, उपवनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक नवेगाव नागझिरा जयरामेगौडा आर., निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, उपसंचालक पवन जेफ, विभागीय वन अधिकारी प्रदीप पाटील व राजेंद्र सदगीर यावेळी उपस्थित होते.

जगात चौदा देशात वाघांचा अधिवास आहे. वाघांची सर्वाधिक संख्या ही भारतात व त्यातही महाराष्ट्र विदर्भात आहे. महाराष्ट्रात २०१४ मध्ये १९० वाघ होते ते २०१९ च्या गणनेत ते ३१२ झाले आणि आता ५०० च्या वर वाघांची संख्या आहे. यात सर्वाधिक वाघ विदर्भात आहेत. याचाच अर्थ विदर्भ हे जगाचे टायगर कॅपिटल झाले आहे असे श्री. मुनगंटीवार यांनी सांगितले. भारत सरकारने पहिल्या टप्प्यात पाच वाघांचे स्थानांतरण करण्याची परवानगी दिली आहे. त्यानुसार आज नवेगाव । पान २ वर

## कोल्हापुरात आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर; काम वर्षभरात पूर्ण करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

कोल्हापूर : कोल्हापूर शहरातील राजाराम तलावाच्या काठी अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर उभारण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी बैठक पार पडली. कोल्हापूर शहराच्या वैभवात भर घालणारे हे सेंटर वर्षभरात तयार करावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. या सेंटरसाठी नगरविकास विभागाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याचे बांधकाम एमएसआरडीसीच्या माध्यमातून करण्यास मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली. शहराच्या ऐतिहासिक वैभवात भर घालणारे सेंटर निर्माण करावे, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृहावर झालेल्या बैठकीस राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, माजी आमदार चंद्रदीप नरके, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी राहुल रेखावार आदी उपस्थित होते. राजाराम तलावाजवळ तयार होणाऱ्या या कन्व्हेंशन सेंटरमध्ये २ हजार क्षमतेचं ऑडिटेरिअम, बहुउद्देशीय हॉल, कॉन्फरन्स हॉल, आर्ट गॅलरी, म्फीथिएटर आदी सुविधा असतील. राजाराम तलावामध्ये संगीत कारंजे, लाईट ण्ड साऊंड शो ठेवण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. 'स्थानिक कलावंतासाठी आर्ट गॅलरी, म्फीथिएटर हक्काचे व्यासपीठ होणार असून याठिकाणी शहर आणि परिसरातील छोटे व्यासायिक, उद्योजक यांना विविध विषयांवर प्रदर्शनासाठी केंद्र उपलब्ध होणार आहे. सेंटर निर्माण करतानाच त्याठिकाणी वृक्षरोपण करून त्याचे सुशोभीकरण करावे. त्याचबरोबर याभागात येणाऱ्या लोकांची संख्या लक्षात घेता पंचतारांकीत हॉटेलसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत

यावेळी चर्चा करण्यात आली. यावेळी करवीर तालुक्यातील नंदवाळमध्ये भारत राखीव बटालियन क्र.३ ला जागा मंजूर करण्यासाठी बैठक घेण्यात आली. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी जागेवर जाऊन पाहणी करावी आणि लोकांचे हित तसेच भारत राखीव बटालीयनसाठी आवश्यक असलेल्या सोयी सुविधांबाबत चर्चा करावी, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



## ✻ सुविचार ✻

शिक्षण म्हणजे मानवाच्या अंगी जे सुप्त पूर्णत्व आहे, त्याचेच प्रकटीकरण होय.- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### वाहनांचा अपघात..

गेल्या काही वर्षांत वाहनांची संख्या वाढली तसे अपघातांचे प्रमाणही वाढीला लागले आहे. या अपघातांमागे 'बेदरकारपणा' हे कारण निश्चित असल्याने त्यावर प्रसारमाध्यमांसह वाहतूक तज्ज्ञांनीही सरकारचे लक्ष वेधण्याचा वारंवार प्रयत्न केला आहे. आता या बेदरकारीला चाप लावण्याचे प्रयत्न शिंदे सरकारकडून होत असून बेभान होऊन वाहन चालविणे यापुढे अजामीनपात्र गुन्हा ठरणार आहे. सरकारचा हा निर्णय योग्य आहे. पण संबंधित यंत्रणा अपघात बेदरकारपणे वाहन हाकल्यामुळे झाला हे कसे ठरविणार, हा प्रश्न आहे. अनेकदा वाहनांचा अपघात नेमका कसा झाला हेच लक्षात येत नाही. काही वेळेला इतर वाहनाच्या अपघाताला कारणीभूत ठरणारे वाहन निसटून जाते. अर्थात काही तरी निमित्ताने बेदरकारपणाला चाप बसत असेल तर तो महत्त्वाचा आहे. किंबहुना असा चाप बसलाच पाहिजे. हातात वाहन आले म्हणजे ते भन्नाट वेगानेच पळविले पाहिजे, अशी अनेक चालकांची मानसिकता असते. त्यातून चुकीचे ओव्हरटेक केले जातात. वाहतुकीचे म्हणून जे काही नियम आहेत त्याला हरताळ फासला जातो. काही वेळेला वाहतूक पोलीस किंवा आरटीओ अशा बाबींकडे दुर्लक्ष करतात. यात आर्थिक तडजोडीचा भाग असतो. त्यामुळे वाहनचालकांना या यंत्रणांचे बिलकूल भय राहिलेले नाही. उद्या बेदरकारपणा अजामीनपात्र गुन्हा ठरणार असला तरी तो गुन्हा दाखल होईपर्यंत तडजोडीचे अनेक प्रयत्न होतील ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. देशात दुचाकी आणि चारचाकी तसेच अवजड वाहनांची संख्या ३० कोटींहून अधिक आहे. यात दुचाकींची संख्या अधिक आहे. वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सीएनजी, इलेक्ट्रिक वाहने खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल मोठा आहे. वाढते प्रदूषण रोखण्यासाठी किंवा नियंत्रणात आणण्यासाठी अशा वाहनांची संख्या वाढणे गरजेचे आहे. परंतु अशी वाहने आली म्हणून अपघातांना आळा बसेल असे नव्हे. वाहतूक निर्विघ्नपणे सुरू राहावी याकरिता सुसज्ज रस्ते गरजेचे आहेत. मात्र, रस्ते गुळगुळीत किंवा चकाचक झाले म्हणजे वाहन ताशी शंभर किलोमीटरहून अधिक वेगाने पळविण्यास काही हरकत नाही ही मानसिकता घातक आहे. वाहनाचा वेग कमाल मर्यादेपर्यंत वाढविणे तसेच मद्यप्राशन करून वाहन चालविणे, रात्रीच्या प्रवासात प्रखर दिव्यांचा जास्तीत जास्त वापर करणे, समोरून वाहन येत असताना ओव्हरटेक करण्याचा फाजील आत्मविश्वास दाखविणे अशी एक ना अनेक कारणे अपघातांमागे आहेत. हा बेदरकारपणा रोखायला हवा.

शासन आपल्या दारी विशेष लेखमालिका

# कुशल मनुष्यबळ निर्मितीतून रोजगार देणारा कौशल्य, उद्योजकता विभाग

सध्याच्या घडीला भारत हा जगातील सर्वाधिक तरूणांचा देश आहे. तरूणाईच्या हाताला काम देऊन बेरोजगारीच्या आव्हानावर मात करण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग काम करत आहे. या माध्यमातून युवाशक्तीला योग्य दिशा आणि मार्गदर्शनाची जोड दिली जाते. या विभागाच्या योजनांची माहिती आजच्या लेखात घेण्यात आली आहे. कौशल्य विकास प्रशिक्षणाद्वारे उमेदवारांना रोजगार, स्वयंरोजगारक्षम बनवणे, जिल्ह्यातील रोजगार व स्वयंरोजगाराच्या मागणीनुसार कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन कुशल मनुष्यबळ निर्माण करणे तसेच युवकांच्या नाविन्यपूर्ण नवसंकल्पनांना वाव देण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे, हे कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे उद्दिष्ट आहे. तसेच, या विभागामार्फत उद्योजकांशी समन्वय साधून त्यांची नोंदणी केली जाते व त्यांच्या मागणीनुसार प्रशिक्षित कुशल उमेदवार पुरवले जातात. बेरोजगार उमेदवारांची नोंदणी केली जाते व त्यांना नोकरी मिळविण्यासाठी मार्गदर्शन व सहाय्य तसेच व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केले जाते.

विभागाच्या पोर्टल वरुन उमेदवारांना ऑनलाईन नाव नोंदणी, नोंदणीचे नूतनीकरण, पात्रतेत वाढ, पत्ता बदल इत्यादि करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. उद्योजकांना रिक्त पदे अधिसूचित करणे, विवरण पत्र भरणे इ. सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.या विभागामार्फत विविध कौशल्य विकास योजना राबविल्या जातात. केंद्र व महाराष्ट्र शासनाद्वारे राज्यात विविध क्षेत्रात कौशल्य प्रदान करून उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगारक्षम बनविण्यासाठी व महाराष्ट्र राज्यात कौशल्य विकास सोसायटी मार्फत नियोजन, समन्वय, अंमलबजावणी आणि देखरेख करण्यासाठी विभागामार्फत विविध योजना राबविल्या जातात. त्यामध्ये प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY) केंद्र पुरस्कृत राज्य व्यवस्थापित, NULM² National Urban Livelihood Mission, प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान - PMKUVA, किमान कौशल्य विकास कार्यक्रम (जिल्हा नियोजन समिती निधीतून), पूर्व कौशल्य ज्ञान मान्यता (RPL) SANKALP - Skill -cquisition and knowledge - wareness Livelihood Promotion या योजनांचा समावेश आहे.

या विभागामार्फत अनुकूल व्यावसायिक वातावरण निर्मिती करून नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. स्टार्ट अप्सना सक्षम करण्यासाठी आर्थिक व इतर अनुषंगिक सहाय्य केले जाते. विविध सुविधा उपलब्ध करून स्टार्टअप्स ईकोसिस्टीमला विकसित करण्यासाठी प्रयत्न केले जातात. नवीन व जागतिक दर्जाचे इनक्यूबेटर्स स्थापित करणे, महाराष्ट्र व्हर्च्युअल इनक्यूबेटर्सचा विकास करणे, व्यवसाय योजना स्पर्धेसारख्या जिल्हास्तरीय कार्यक्रमांचे आयोजन करणे, कार्यशाळा व इतर संवादाद्वारे या धोरणाबद्दल जिल्ह्यांमध्ये जनजागृती करणे या बाबीही या विभागामार्फत केल्या जातात.

रोजगार मेळावे : ही योजना नियोक्ते आणि नोकरी शोधणाऱ्यांसाठी असून, उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि कोणत्याही शुल्काशिवाय नियोक्त्याला योग्य उमेदवार उपलब्ध करून देण्यासाठी नियोक्ता आणि नोकरी शोधणाऱ्यांना एकाच छताखाली आमंत्रित करणे. रोजगार मेळाव्यातून उमेदवारांना अनेक उद्योजकांकडे एकाच ठिकाणी मुलाखतीची संधी प्राप्त होते व उद्योजकांना आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळाची उपलब्धता करुन देण्यात येते.

रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम (Employment Promotion Programme) : ही योजना सामान्यतः 'ईपीपी' म्हणून ओळखली जाते. रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम (EPP) ही खाजगी क्षेत्रातील आस्थापना/ उद्योगांमध्ये नोकरी शोधणाऱ्यांना त्यांची कौशल्ये सुधारण्यासाठी आणि त्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी On job Training देण्याची योजना आहे. ही योजना नोकरी शोधणाऱ्यांसाठी सुरू करण्यात आली. या प्रशिक्षणासाठी किमान १० वी उत्तीर्ण आणि १८ वर्षे व त्यावरील वयाचे उमेदवार पात्र आहेत. प्रशिक्षण कालावधी सहा महिने असतो. प्रशिक्षणादरम्यान उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार मासिक स्टायपेंड मिळतो. मॉडेल करिअर सेंटर : जिल्ह्यातील रोजगार इच्छुक उमेदवारांना रोजगाराच्या संधी, तंत्रज्ञानाचा वापर करुन उमेदवारांना व्यवसाय मार्गदर्शन, समुपदेशन आणि प्रशिक्षण उपलब्ध करुन देणे. उमेदवारांची मूल्यमापन चाचणी (वर्तणूक, मानसशास्त्रीय, कौशल्य, कल इ. चाचणी) घेणे, समुपदेशन करुन रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणेबाबत सहाय्य केले जाते. तज्ञ व्यक्तिंमार्फत व्यवसाय मार्गदर्शन केले जाते.उद्योजकता बाबत योजना : राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी राज्य शासनाने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना केली आहे. त्यामार्फत स्वयंरोजगार इच्छुक उमेदवारांना स्वयंरोजगाराबाबतची माहिती, मार्गदर्शन व आर्थिक सहाय्य केले जाते.नोंदणीसाठी संकेतस्थळ rojgar.mahaswayam.gov.in अधिक माहितीसाठी संपर्क – जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थ कोट, पार्क चौक, सोलापूर ०२१७-२९५०९५६ **(संकलन – जिल्हा माहिती कार्यालय,सोलापूर)**

पान १ वरुन

### सिद्धरामय्या यांनी घेतली

मुख्यमंत्री तर डीके शिवकुमार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. या शपथविधीला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, माजी अध्यक्ष सोनिया गांधी, काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार देखील उपस्थित आहेत. तर महाराष्ट्रात महाविकास आघाडीतील मित्रपक्ष म्हणून काँग्रेसकडून विरोधी पक्षातील दिग्गज नेत्यांना शपथविधीसाठी आमंत्रण देण्यात आले होते. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी स्वत: उद्धव ठाकरे यांना फोन करुन निमंत्रण दिलं होतं. परंतु उद्धव ठाकरे शपथविधीला हजर नसल्याचे पाहायला मिळत आहे. त्यांच्या अनुपस्थितीचं नेमकं कारण मात्र समजू शकलेलं नाही. मात्र ठाकरे गटाकडून शिवसेना खासदार प्रियंका चतुर्वेदी यांची उपस्थिती पाहायला मिळत आहे.

### जगासाठी उत्कृष्ट शिक्षक घडवून..

विदेशात शिक्षण घेतले परंतु देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी पुन्हा भारतात परत आले, याचे स्मरण देऊन विद्यार्थ्यांनी विदेशात शिक्षण घेतले तरी देखील देशाच्या विकासात योगदान देण्यासाठी परत आले पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले. शाळेच्या २०२३ वर्षाच्या ९७ विद्यार्थ्यांना यावेळी शालान्त आयबी डिप्लोमा प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते विशेष प्राविण्य प्राप्त करणाऱ्या स्नातकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला आमदार मनिषा चौधरी, आमदार पंकज भोयर, सिंगापूर इंटरनॅशनल स्कूलच्या संचालिका शारोनी मल्लिक, प्राचार्य ग्रॅम कॅसलेक, आयबी प्रमुख अब्सोलोम मुसेवे, स्नातक विद्यार्थी तसेच शिक्षक व पालक उपस्थित होते.

### वारकऱ्यांना कोणताही त्रास

असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले. कऱ्हा नदीवरील पुलाच्या कामालाही जिल्हाधिकाऱ्यांनी भेट देऊन कामाला गती देण्याचा सूचना दिल्या. कोणत्याही परिस्थिती पुलाचे काम पूर्ण करून पालखी पुलावरून जाईल असे नियोजन सुरू असल्याचेही डॉ. देशमुख म्हणाले.

जेजुरी पालखीतळाच्या सीमाभिंतीच्या कामाची पाहणी करून हे काम वेळेत पूर्ण करा अशा सूचना त्यांनी दिल्या. डॉ.देशमुख यांनी सासवड जवळील बोरावके मळा विसावा, वाल्हे पालखीतळ, नीरा पालखी विसावा स्थळ पाहणीदेखील केली . नीरा नदीवरील पुलाच्या संरक्षक कठड्यांची दुरुस्ती तत्काळ करून घ्या असेही त्यांनी सांगितले. हवेली तालुक्यात ऊरुळी देवाची पोलीस ठाण्याजवळील विसाव्याच्या ठिकाणाची डागडुजी करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. वडकी विसावा येथे स्थायी स्वरुपात उभारण्यात आलेल्या सिमेंट काँक्रेट स्टेजचीही त्यांनी पाहणी केली.

### नोटबंदीसारखे निर्णय देशाला

एटीएममध्येही जात नव्हत्या. म्हणजे नोटा एटीएममध्ये जात आहेत की नाहीत हे देखील पाहिलं नव्हतं. हे असले निर्णय परवडणारे नसतात देशाला. आता लोकांनी परत बँकेमध्ये पैसे टाकायचे, परत तुम्ही नवीन नोटा आणणार, असं सरकार चालतं का? असे प्रयोग होतात का?

२००० रुपयांची नोट चलनातून रद्द करण्याचा भारतीय रिझर्व्ह बँकेने घेतला आहे. मात्र, २००० रुपयांच्या नोटांचा वापर ३० सप्टेंबरपर्यंत करता येणार आहे. ज्या नागरिकांकडे दोन हजार रुपयांच्या नोटा आहेत, अशा नागरिकांना आरबीआयने नोटा बदलून देण्यासाठी ३० सप्टेंबर २०२३ पर्यंतची मुदत दिली आहे. त्याशिवाय, बँकांनाही ग्राहकांना एटीएम अथवा इतर मार्गाने २००० रुपयांची नोट न देण्याचेही निर्देश दिले आहेत.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे शुक्रवारपासून (१९ मे) तीन दिवसीय नाशिक दौऱ्यावर असून काल संध्याकाळच्या सुमारास त्यांचं नाशकात आगमन झालं. आगामी निवडणुकांच्या दृष्टीने पक्षांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांमध्ये प्राण फुंकण्याचे काम नेतेमंडळी करत आहेत. याच पार्श्वभूमीवर मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे हे नाशिकच्या दौऱ्यावर आहेत. १९ ते २१ मे च्या दरम्यान ते नाशिकमध्ये तळ ठोकून असणार आहेत. लवकरच महापालिकेच्या निवडणुका होतील असा अंदाज बांधला जात आहे. त्यामुळे ते संघटनात्मक आढावा घेणार आहेत. राज ठाकरे यांना नाशिक महापालिकेत सर्वप्रथम २०१२ ते २०१७ सत्ता मिळाली होती.

### नवेगाव–नागझिरा पर्यटकांचे आकर्षण

नागझिरा प्रकल्पात वाघिणीचे स्थानांतरण करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या ठिकाणी ११ वाघ असून वीस वाघ अधिवास क्षमता असल्याचे सांगून ते पुढे म्हणाले की, वन्यजीव प्रेमी, अभ्यासक व पर्यटकांसाठी नवेगाव नागझिरा आकर्षण केंद्र ठरणार आहे.

पुढील टप्प्यात तीन वाघांचे स्थानांतरण करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. नवेगाव नागझिरा प्रकल्पात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. स्थानिक ४०० युवकांना प्रशिक्षण तसेच शंभर वाघमित्र नेमले आहेत. वाघमित्रांना दोन हजार रुपये सन्माननिधी देण्यात येत येतो. तसेच पर्यटकांसाठी अत्याधुनिक सहा वाहने देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सारस संवर्धनासाठी ६२ कोटींचा आराखडा बनविण्याच्या न्यायालयाच्या सुचना आहेत त्यावर काम सुरू असल्याचे मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले.

पाच वाघांचे स्थानांतरण गेली दहा महिने वन विभाग या विषयावर काम करत होते. माळढोक व गिधाड पक्षी संवर्धन सुद्धा गरजेचे असून त्यासाठी वनविभाग आराखडा बनवित असल्याचे त्यांनी सांगितले. चिमण्या आता कमी दिसतात. येणाऱ्या पिढीला चिमणी केवळ कथा कवितेतूनच समजू नये म्हणून चिमण्यांचे संवर्धन आवश्यक आहे असे ते म्हणाले. कुरण विकास करणे व पाणवठे वाढविणे यावरही काम सुरू आहे.

नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र महाराष्ट्रातील गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात स्थित असून २०१३ मध्ये अधिसूचित करण्यात आलेला हा व्याघ्र प्रकल्प आहे. नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र हा देशातील ४६ वा व राज्यातील ५ वा व्याघ्र प्रकल्प असून प्रोजेक्ट टायगर अंतर्गत स्थापना करण्यात आलेला आहे. नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे गाभा क्षेत्र ६५६.३६ चौ.कि.मी. आहे तसेच १२४१.२४ चौ. कि.मी. बफर क्षेत्र घोषित करण्यात आले आहे. ऑल इंडिया टायगर ईस्टिमेशन २०२२ च्या अहवाल नुसार नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रा मधे किमान ११ प्रौढ वाघ असल्याचे नमूद आहे. सध्यस्थितीत व्याघ्र क्षेत्र हा कमी व्याघ्र घनतेचा भूभाग असून, नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रात २० प्रौढ वाघ वास्तव्य करण्याची क्षमता आहे.

वाघांचे संवर्धन व स्थानांतर (Conservation Translocation of Tigers) या उपक्रमा अंतर्गत एकूण ४–५ मादी वाघिणींना ब्रह्मपुरी भूभागातून नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रात स्थानांतरीत करणे प्रस्तावित आहे. पहिल्या टप्प्यात २ मादी वाघिणीचे नागझिरा वन्यजीव अभयारण्य येथे आज स्थलांतर करण्यात आले आहे. दोन्ही वाघिणींना नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राच्या गाभा भागात सोडण्यात आले. वाघिणींना सोडल्या नंतर सॅटेलाईट जीपीएस कॉलर व व्हिएचएफ (Satellite GPS collar d VHF) च्या सहाय्याने दोन्ही वाघिणींचे २४ ु ७ सक्रियपणे सनियंत्रण केले जाईल. संपूर्ण सनियंत्रणाचे कार्य हे कमांड आणि कंट्रोल रूम साकोली येथून नियंत्रीत केले जाणार आहे. या दोन स्थलांतरित वाघिणींच्या निरीक्षणानंतर व उर्वरित घटक लक्षात घेऊन इतर मादा वाघांना टप्प्याटप्प्याने स्थानांतरीत केले जाईल.

या उपक्रमामुळे नवेगाव–नागझिरा व्याघ राखीव क्षेत्रात भविष्यात वाघाच्या संखेत वाढ होवून प्रकल्पात पर्यटनाला चालना मिळू शकते. स्थानिकांना उपजीविकेच्या संधी निर्माण होतील तसेच जास्त व्याघ्र संख्या असलेल्या ब्रह्मपुरी भूभागातील मानवी वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी एक महत्त्वाचा उपाय ठरू शकतो.

# सामुदायिक विवाहसोहळे समाज व काळाची गरज : मुख्यमंत्री शिंदे

पालघर : सामुदायिक विवाहसोहळे समाज व काळाची गरज आहे. असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. बोईसर (जि. पालघर ) येथील आदिवासी तसेच आर्थिक दुर्बल घटकातील वधू-वर सामुदायिक विवाह सोहळ्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित होते त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्र्यांनी यावेळी वधू वरांना शुभेच्छा दिल्या. सामुदायिक विवाहसोहळ्यातील विवाहासाठीच्या अनुदानात २५ हजार रुपयांपर्यंत वाढ करण्यासाठी त्यांनी सकारात्मकता दर्शवली.यावेळी आमदार रवींद्र फाटक, राजेश पाटील, श्रीनिवास वनगा, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून अशा कार्यक्रमाला प्रत्येकाने आवर्जून वेळ काढून जायला हवे. अशा सोहळ्यातून आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील वधू-वरांचा विवाह होतो ही आनंददायी बाब आहे. सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी प्रत्येकाने सामुदायिक विवाह सोहळ्याला सहकार्य केले पाहिजे. कर्ज काढून




लग्नसोहळे केल्याने पालकांच्या मागे चिंता लागतात. असा खर्च टाळता यावा यासाठी असे सामुदायिक विवाहसोहळे गरजेचे असून ही समाज व काळाची गरज आहे, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले.मुख्यमंत्री श्री. शिंदे पुढे म्हणाले की, शेतकरी सन्मान योजनेतून केंद्राचे ६ हजार रुपये व राज्य सरकारचे ६ हजार रुपये असे एकूण १२ हजार रुपये शेतकरी बांधवांना देण्यात येतात.या भागाच्या विकासासाठी सरकार प्रयत्नशील आहे. बांद्रा वर्सोवा ब्रिज विरारपर्यंत आणला जाईल. कामगारांसाठी १५० बेडचे ईएसआय हॉस्पिटल अंतिम टप्प्यात आहे. विरारपासून कोस्टल हायवे क्सेस कंट्रोल थेट पालघरपर्यंत नेण्याचा प्रयत्न आहे. एमएमआरडीएद्वारे आवश्यक प्रकल्प या परिसरात राबवले जातील जातील, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले

# पर्यावरण आणि हवामान शाश्वतता कार्य गटाची तिसरी बैठक उद्यापासून मुंबईत

मुंबई : भारताच्या जी २० परिषदेच्या अध्यक्षतेअंतर्गत पर्यावरण आणि हवामान शाश्वतता कार्य गटाची तिसरी बैठक उद्या दि. २१ ते २३ मे २०२३ दरम्यान मुंबईत आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीचे मुख्य उद्दिष्ट संवादाच्या आराखड्याच्या अनुषंगाने होणाऱ्या फलनिष्पत्तीवर आधारित दृष्टीकोन ठेऊन चर्चा करण्यावर असेल.या तीन दिवसीय बैठकीची सुरुवात जुहू चौपाटीवर किनारपट्टी स्वच्छता मोहिमेने होईल. यानंतर 'ओशन-२०' संवादाचे आयोजन करण्यात येईल. आपले समुद्र किनारे आणि महासागरांचे रक्षण करण्याविषयी लोकांमध्ये जनजागृती निर्माण करणे आणि सामुदायिक सहभागाची जाणीव करून देणे किनारपट्टी स्वच्छता मोहिमेचे उद्दिष्ट आहे.

ओशन-२० मंचाची सुरुवत इंडोनेशियाच्या जी- २० अध्यक्षते दरम्यान महासागर विषयक प्रश्नांवरील विचार आणि कृती पुढे नेण्यासाठी झाली होती.

या उपक्रमाचे सातत्य कायम राखून त्यात अधिक भर घालण्याच्या हेतूने भारताच्या अध्यक्षतेखाली सक्रीय नेतृत्वाचे दर्शन घडवून पर्यावरण आणि हवामान शाश्वतता कार्य गटाच्या तिसऱ्या बैठकीत नील अर्थव्यवस्थेच्या तीन स्तंभांवर अधिक लक्ष केंद्रित केले जाईल. या दोन्ही उपक्रमांच्या माध्यमातून शाश्वत आणि हवामानाच्या दृष्टीने संवेदनक्षम नील अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देण्याचा उद्देश आहे.बैठकीच्या पहिल्या दिवशी होणारे सत्र 'नील अर्थव्यवस्थे'च्या विविध पैलूंवर आधारित असेल. या दिवशीचे पहिले सत्र हे नील अर्थव्यवस्थेसाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या विषयावर असेल. त्यानंतर धोरणे, शासन आणि सहभाग या विषयांवर परिसंवाद होतील तर नील अर्थव्यवस्थेसाठी वित्त पुरवठा यंत्रणा स्थापन करणे या संदर्भात समारोपाचे सत्र होईल.

या सत्राची रचना, पॅनल चर्चा आणि त्यानंतर श्रोत्यांशी संलग्न चर्चा अशाप्रकारे केली गेली आहे. महासागरांची जपणूक आणि त्यांची हानी थांबवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न आणि आपल्या सागरी स्त्रोतांचे रक्षण करण्यासाठीच्या चर्चेवर या परिसंवादात भर दिला जाणार आहे.

पर्यावरण आणि हवामान शाश्वतता कार्य गटाच्या तिसऱ्या बैठकीत पुढील दोन दिवस जी २० देशांमधील एकमत साध्य करण्याच्या दिशेने विचारमंथन करून मसुद्याच्या मंत्रिस्तरीय बैठकीच्या आराखड्यावर चर्चा केली जाईल. यानंतर अंतर्गत सत्रानंतर चौथ्या एउडथ्रऋ बैठकीच्या नियोजना विषयी चर्चा होऊन समारोप होईल.जी २० सदस्य राष्ट्रांमध्ये महासागरांचे शाश्वत व्यवस्थापन आणि समुद्री जैवविविधतेचे रक्षण करण्यासाठी अत्याधुनिक उपाय विकसित करण्यावर भारताच्या जी २० परिषदेच्या अध्यक्षतेखालील पर्यावरण आणि हवामान शाश्वतता कार्य गट भर देत आहे. एकत्रित जागतिक प्रयत्नांची आवश्यकता आणि सध्याची परिस्थिती हाताळण्यासाठी त्वरित कृतीची गरज यावर प्रत्येक बैठकीत सातत्याने भर देण्यात आला आहे.

शाश्वत आणि संवेदनशील भविष्या करता जी २० देश, निमंत्रित देश आणि आंतरराष्ट्रीय संघटनांच्या प्रयत्नांना चालना देण्यासाठी तिसरी एउडथ्रऋ बैठक एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, प्रत्येक प्राधान्य क्षेत्रांतर्गत परिणाम साध्य करण्यासाठी आणि सर्वांसाठी शाश्वत आणि संवेदनशील भविष्य घडवण्यासाठी सर्व भागधारकांसोबत कार्य करण्यासाठी वचनबद्ध आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# ग्रामीण पाणी पुरवठा ई निविदा मध्ये कायदा डावलून काम
## अतिरिक्त सी.ओ. कोहीणकर मागविले अवहाल

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील कंटेहल्लि येथील पाणी पुरवठा ई निविदा मध्ये कायदा डावलून अनियमितता दाखवून कार्यरंभ आदेश दिल्याने अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी संदीप कोहीणकर यांनी मुख्य लेखा अधिकारी आणि प्रभारी कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड यांना तात्काळ अवहाल सादर करण्याचे आदेश दिले आहे.

अक्कलकोट तालुक्यातील मौजे कंटेहल्लि येथील पाणी पुरवठा ई निविदा मध्ये अतिरिक्त सुरक्ष ठेव रक्कमेचा धनाकर्ष रक्कम मुदती नंतर सु.बे.ठेकेदार पवार यांनी भरला असून तत्कालीन कार्यकारी अभियंता कोळी यांनी कायदा डावलून भरून घेतला आहे.या सु.बे.ठेकेदार पवार यांना अपात्र ठरविण्याचा शासन निर्णय असतानाही अपात्र ठरविला नाही. तसेच त्यांना काळा यादीत टाकून सोलापूर जिल्हा परिषदेकडील ई निविदा प्रक्रियामध्ये पुन्हा सहभाग घेता येणार नसले बाबत कारवाई करण्याची शासन निर्णय असतानाही दीपक कोळी यांनी कायदा डावलून कारवाई केले नाही. २२-२३ या चालू आर्थिक वर्षात ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालय कडून ठेकेदार पवार यांनी फक्त सहा महिन्यात दोन कोटी सतरा लाख रु. चा. काम घेतले आहे.पण चालू आर्थिक वर्षात एकही कामे घेतला नाही.असा ई निविदा लिफाफा मध्ये खोटा हमीपत्र तसेच पाचशे रुपये बॉण्ड पेपर वर खोटी माहिती सादर करून निविदा शर्ती व अटीचा भंग केला आहे.यामुळे त्यांना तात्काळ अपात्र करणे बंधनकारक असताना अपात्र केली नाही. सरकारी नोकरानी कायदा डावलून नियमबाह्य काम करणे हा फोजदरी गुन्हा आहे हे ज्ञात असतानाही दीपक कोळी यांनी कायदा डावलून कर्तव्यात कसूर करून अनियमितता दाखवुन नियमबाह्य कार्यरंभ आदेश दिले आहेत.

सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना चालू आर्थिक एका वर्षात ३ कोटी पर्यंतचे कामे घेता येतो आणि त्यांना अपात्र ठरविता येणार नाही असा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण २३७ या शासन निर्णयमध्ये कुठेही उल्लेख नाही. विशेष म्हणजे सुशिक्षित बेरोजगार अभियंताचा नोंदणी दर्जा वाढ करण्यासाठी २३७ हा शासन निर्णय आहे. परंतु या निर्णयचा गैर वापर करून तत्कालीन कार्यकारी अभियंता दीपक कोळी यांनी कायदा डावलून नियमबाह्य कार्यरंभ आदेश दिले आहेत. २३७ या शासन निर्णय मध्ये सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना चालू आर्थिक एका वर्षात ३ कोटी रुपये पर्यंत कामे घेण्याचे मर्यादा असेल तर ई निविदा लिफाफा मध्ये प्रतीवर्षी दीड कोटी रुपये पेक्षा जास्त कामे घेतले नसले बाबतचा हमी पत्र का? घेतला आहे. तसेच सदर हमीपत्र ई निविदा लिफाफा मध्ये स्कॅन करून जोडणे बंधनकारक आहे. या दुटप्पी धोरणा मुळे पाणी पुरवठा विभागात आंधळा दळतोय अन् कुत्रा पीठ खातोय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या बाबत गेल्या तीन महिन्यापूर्वी कायदा डावलून दिलेल्या चुकीचे कार्यरंभ आदेश रद्द करून एल टू ला सदर काम देण्या बाबत बसवराज बिराजदार यांनी अनेक वेळा लेखी अर्जद्वारे मागणी केली होती. परंतु प्रभारी कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड यांनी कायदा डावलून चुकीचे नियमबाह्य कामास पाठीशी घालत होते. या बाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहीणकर यांनी कटकधोंड यांना समक्ष बोलावून जाब विचारला. यावेळी नोटीस बजावून दोन दिवसात सदर नियमबाह्य काम थांबवितो अशी सांगितले. परंतु महिना उलटून गेला तरी सुनील कटकधोंड यांनी नियमबाह्य काम थांबविले नाही.यामुळे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहीणकर यांनी कंटेहल्लीं येथील नियमबाह्य कामाचे तात्काळ अवहाल सादर करण्याचे आदेश दिले आहे.

# महंत यशवंत महाराज व त्यांच्या तीनही बहिणीनी दिल्या उमरिगड तीर्थक्षेत्रासाठी शेतजमीन




अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री सेवालाल महाराज व श्री जेतालाल महाराज यांचे वंशज महंत यशवंत महाराज व त्यांच्या तीनही बहिणीनी त्यांच्या नावे असलेली वडिलोपार्जित शेतजमीन उमरिगड तीर्थक्षेत्रासाठी तहसिलदाराना दान स्वरूपात जमिनी दिले.आणि देशभरातील बंजारा समाजाकडून कौतुक होत आहे.

महाराष्ट्र शासनाने उमरिगड तीर्थक्षेत्र विकासासाठी मंजूर केलेल्या निधीचे काम व्हावे व त्यातून जगदंबा माता श्री जेतालाल महाराज,सामकी माता व प्रल्हाद महाराज यांच्या मंदिरांचे विकास जलदगतिने व्हावे व विविथ राज्यातून येणाऱ्या भाविक भक्तांना राहण्याची व्यावस्था व्हावी ह्या उद्देशाने शासनास वीणा मोबदला अमूल्य अश्या किमतीची शेतजमीन दान करून त्यावर सोयी सुविधा करावी.ह्या उद्देशाने दान करून समस्त बंजारा समाजाची काशी असलेली उमरीगड येथील देवस्थानला विकासाला खूप मोठ्या स्वरूपाची मदत मिळालेली आहे.बंजारा समाजातील भक्ताकडून महंत यशवंत महाराज व त्यांच्या तिनही बहिणींचे खूप खूप आभार असल्याचे म्हणाले.

# मंडळाचा परिसर हा एक उत्तम उर्जा देणारे स्त्रोत्र : निखील राऊत




अक्कलकोट/प्रतिनिधी : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेले स्वामी कार्य भक्ताअभिमुक असून मंडळाचा परिसर हा एक उत्तम उर्जा देणारे स्त्रोत्र असल्याचे मनोगत अभिनेता निखील राऊत यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. य प्रसंगी ठाणे मध्यवर्ती कारागृह चे अधीक्षक हर्षद अहिराव यांचा देखील सत्कार अमोलराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, आतिष पवार, निखील पाटील, प्रवीण घाडगे, मल्लिकार्जुन बिराजदार, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, श्रीनिवास गवंडी, प्रसन्ना बिराजदार, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, मुन्ना कोल्ले, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, देवराज हंजगे, मल्लिनाथ कोगनुरे, लाला निंबाळकर, कल्याण देशमुख यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षी महादेव जानकर यांच्या वाढदिवसानिमित्त बादोले बु.सर्व रोग निदान शिबीर संपन्न




अक्कलकोट/तालुका प्रतीनीधी : राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी मंत्री महादेवजी जानकर यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त बादोले बु. ता. अक्कलकोट येथे हनुमान मंदिर येथे भव्य रक्तदान शिबीर, नेत्र तपासणी, दंत तपासणी व सर्व रोग निदान शिबीर आयोजित करण्यात आले होते या शिबीराचे उद्घाटन वागदरी जिल्हा परिषद गटाचे सदस्य माजी विरोधी पक्षनेते आनंद तानवडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील बंडगर, रिपाइंचे तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे, राष्ट्रीय समाज पक्षाचे धाराशिव जिल्हा अध्यक्ष संजय घोडके, राष्ट्रीय समाज पक्षाचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष अशोक ढोणे, जिल्हा उपाध्यक्ष तमण्णा घोडके, विधानसभा संपर्क प्रमुख शिवानंद गाडेकर, बादोल्याचे सरपंच माणिक धायगोडे, ग्रामसेवक धर्मसाले साहेब, शिरवळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य अधिकारी डॉ. कांते मॅडम, राष्ट्रीय समाज पक्षाचे सलगर जिल्हा परिषद गट प्रमुख रेवणसिध्द शेरी, बादोल्याचे शाखा अध्यक्ष पांडूरंग सलगरे, युवा नेते विठ्ठल कत्ते, माजी सरपंच गौरीशंकर गायकवाड, माजी उपसरपंच खाजेभाई अत्तार, म्हाळू धर्मसाले, सिध्दाराम सलगरे, महेश सोलंकर, कोंडीबा माडकर, तुळशीराम माडकर, धुळबा माडकर, प्रकाश बंडगर, कमलाकर माशाळे, गजानन खरात, अरबाज शेख, सद्दाम शेख, सुरज शेख आदी उपस्थित होते.

रक्तदान शिबीरात ४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर सर्व रोग निदान शिबीरात १३८ लोकांना तपासणी करुन औषधोपचार देण्यात आले. ३५ जणांची नेञतपासणी करुन त्यांना चश्मा वाटप करण्यात आले. २५ जणांची दंत तपासणी करण्यात आली. बादोले गावात प्रथमच सर्व रोग निदान शिबीराचे आयोजन करण्यात आल्याने या शिबीराचा गावकरी व पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. यावेळी बोलताना जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आनंद तानवडे म्हणाले की, राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी मंत्री आमदार महादेव जानकर यांच्या वाढदिवसानिमित्त बादोले येथे आयोजित सर्व रोग निदान शिबीर आयोजित केल्याने सर्व रुग्णांना याचा लाभ घेण्यात आला. महादेव जानकर यांनी बहुजन समाजातील युवकाला जागृत करुन राष्ट्रीय समाज पक्षाच्या माध्यमातून सत्ताधारी व विरोधकांना सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. त्यांचे विचार तळागाळापर्यंत पोहचवून उपेक्षित समाजाला अपेक्षित ठिकाणी नेण्यासाठी सर्वांनी साथ देण्याचे आवाहन केले. यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील बंडगर, धाराशिव जिल्हा अध्यक्ष संजय घोडके, रिपाइंचे तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या शिबिरात रक्त संकलन करण्यासाठी महात्मा बसवेश्वर रक्तपेढी सोलापूर, नेञतपासणी साठी एच. व्ही. देसाई हॉस्पिटल व्हिजन सेंटर अक्कलकोट, दंत तपासणी साठी जयभारती डेंटल क्लिनिक व इम्प्लान्टचे डॉ. सतीश सोलनकर, तर सर्व रोग निदान शिबीरसाठी जिवन आरोग्य वर्धिनी केंद्र शिरवळचे आरोग्य अधिकारी तसेच कर्मचारी वर्ग, बादोले ग्रामपंचायचे अंगणवाडी सेविका, आशा सेवीका मदतनीस यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सुञसंचालन राष्ट्रीय समाज पक्षाचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर यांनी केले तर आभारप्रदर्शन माजी सरपंच गौरीशंकर गायकवाड यांनी केले.

# पदोन्नती प्रक्रिया ३० मे पर्यंत पूर्ण करणार

सोलापूर/प्रतिनिधीः शिक्षकांची पदोन्नती प्रक्रिया ३० मे पर्यंत पूर्ण करण्याचा शब्द प्रभारी शिक्षणाधिकारी संजय जावीर यांनी दिल्यानंतर गुरुसेवा परिवाराने चक्री उपोषण मागे घेतले. शिक्षकांच्या पदोन्नतीसाठी पाच दिवसांपासून गुरुसेवा परिवारातर्फे उपोषण सुरू होते. पदोन्नत्यांसंदर्भात उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधीन शेळकंदे व प्रभारी शिक्षणाधिकारी जावीर यांच्या संयुक्त सहीने पदोन्नतीचा कालबध्द कार्यक्रम निश्चित करून ३० मे पर्यंत सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याविषयीचे लेखी पत्र दिले. त्यानंतर सुरू असलेले उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी अंकुश काळे, म. ज. मोरे, राजाभाऊ राऊत, सूर्यकांत हत्तुरे, बब्रुवान काशीद, संजय सावंत, एजाज शेख, संजय चाफाकारंडे आदी उपस्थित होते.

# उत्तम आरोग्यासाठी व्यसन मुक्त रहा : मारुती बनसोडे




नळदुर्ग/प्रतिनिधी : उत्तम आरोग्यासाठी व्यसन मुक्त रहावे तरच जीवन सफल होईल असे मत नशा बंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे उस्मानाबाद जिल्हा संघटक मारुती बनसोडे यांनी आज बोलताना सांगितले.नशा बंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र राज्य, समाज कल्याण आयुक्त कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आज पासून दि.१८ ते ३१ मे २०२३पर्यन्त तंबाखू सेवन विरोधी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे

लातूर विभागीय संघटक कैलास गायकवाड नांदेड, मारुती बनसोडे उस्मानाबाद, प्रा.डॉ. विष्णू कांबळे लातूर, विशाल अग्रवाल हिंगोली हे सर्वजण आपल्या जिल्ह्यात तंबाखू सेवन विरोधी कार्यक्रम आयोजित करीत आहेत. त्याचा एक भाग म्हणून उस्मानाबाद चे संघटक मारुती बनसोडे यांनी बौद्धनगर नळदुर्ग येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय येथे कार्यक्रम घेतला आहे. माहिती पत्रक वाटप केले व्यसमुक्तीसाठी प्रचार प्रसार आणि प्रबोधन कार्यक्रमाची माहिती दिली. अन्न हवे तंबाखू नको हा जागतिक आरोग्य संघटनेच्या स्लोगन ची माहिती दिली.


दर वर्षी तंबाखू सेवन केल्याने लाखो लोक मरतात तंबाखू आरोग्यास हानिकारक आहे याबाबत माहिती दिली गेली मारुती बनसोडे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी बी एन सामाजिक संघटनेचे तुळजापूर तालुका अध्यक्ष उमेश गायकवाड यांनी सहकार्य केले आहे. यावेळी सुनील भांगे, महेश कांबळे यांनी परिश्रम घेतले शेवटी उमेश गायकवाड यांनी आभार मानले.

# पशुसंवर्धन दिना निमित्त गोगांव येथे लसीकरण शिबिर संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधीः पशुसंवर्धन दिना निमित्त गोगांव ता. अक्कलकोट येथे गाय व म्हशीच वंधत्व निवारण व शेळीच लसीकरण शिबिर घेण्यात आले या शिबिराचे उद्घाटन उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, व जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विष्णू कोळेकर, तंटा मुक्त समिती अध्यक्ष सूर्यकांत जिरगे,कलेणी कोंडे, काळे, आदी उपस्थित होते यावेळी गावातील शेळीना लसीकरण करण्यात आले व गाय व म्हशीच वंधत्व तपासणी करण्यात आले



## शब्दकोडे क्र १४१



आडवे शब्द १. खर्चात कपात ६. पुष्कट ९. पोटापुरता शिधा ११. प्रमाणपत्र १२. विश्रांती १४. गणगोत १६. तात्काळ १८. आपला देश १९. मोठी चूल २०. चोरी करणारा २२. झाडलोट २४. वाढलेला व्याप २५. जरतारीचा मोर यावर नाचतो २७. प्रयत्न २८. घाव, प्रहार २९. रोखलेली नजर ३१. संतोष, आनंद ३४. समुद्रकिनारा ३८. पुरुष ३९. शिव! शिव! ४०. नुसतीच भटकंती ४१. विशेष ४२. अत्यंत यातनामय अवस्था ४५. माळ, सर ४६. हात ४८. पर्जन्य ४९. फोडातील द्रव ५०. गप्पांची जागा ५२. वक्र ५३. पूर्ण भेदून जाणारे ५४. शरीर ५५. अरण्य, जंगल ५६. तीव्र, अत्यंत टोकदार ५७. दिवस ५९. अर्धांगवायू ६१. चर्चा ६३. कावळा ६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण ६५. टोळीचा प्रमुख ६७. खिडकी ६९. मच्छर ७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार ७३. हनुमान (ग्रा.) ७५. प्रेम, ममता ७७. हमाल ८१. सूर्याचे एक नाव ८२. ठोक, हाण! ८३. युक्ती ८४. नेता, पुढारी

उभे शब्द १. कपडालत्ता २. टिंगल, टवाळी ३. केव्हा (ग्रा.) ४. शाश्वत, चिरंतन ५. सोन्या-चांदीचा व्यापारी ७. महाशिवरात्रीचा मराठी महिना ८. परस्पर ९. पुन्हा पुन्हा १०. प्रगती, उन्नत १२. विमान १३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र १५. निवासस्थान १७. आत-बाहेर करण्याची चौकट २१. दात २३. वंशपरंपरागत अधिकार २६. फळातील द्रव २७. सामान्य ३०. तापापूर्वीचे शहारे ३२. माणूसकी ३३. धैर्य, हिंमतीचे काम ३५. मगज ३६. कडक, न दबणारे ३७. साहित्यातील नऊ भावना ४१. मीठाची चव ४२. नाकी दम आणणारा आकडा ४३. भरपूर रस असलेला ४४. वेडावाकडा ४५. परिस्थिती ६. पळसाचा डिंक ४७. जन्म-मृत्यू ४८. मोदकाचे आच्छादान ५०. पत्र ५१. अभिप्राय ५३. नाविकदल ५५. मध्यरात्रीचा पाऊस ५८. विरोध, द्वेष ६०. आठवाड्याचा दिवस ६२. चिकटून, जवळ ६६. अति तीव्र, जाळणारे ६८. माफी, दया ७०. दाताखालचा, मदतनीस ७२. महान ७४. कैकयीची दासी ७६. वेदना ७७. वजन ७८. सुंदर तरुणी, पत्नी ७९. शंकर ८०. शेवट

# विविध मागण्यांसाठी सरपंच परिषदेचे मंत्रालयावर आंदोलन

## सर्वांनी आंदोलनात सहभागी व्हावे : सरपंच सौ वनिता सुरवसे यांचे आव्हान



सोलापूर/प्रतिनिधी : ग्रामविकासाच्या अडचणी लक्षात घेऊन सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, प्रदेश उपाध्यक्ष अडवोकेट विकास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच, उपसरपंचांना एसटी महामंडळाच्या बस मध्ये प्रवास मोफत करावा, विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत सरपंच व सदस्यांना मतदानाचा अधिकार मिळावा , सरपंचांना दरमहा सरसकट दहा हजार रुपये व उपसरपंच यांना तीन हजार रुपये तसेच सदस्यांनीही मानधन सुरू करावे तसेच अन्य मागण्यासाठी २२ मे रोजी कराड ते सातारा पदयात्रा आणि सातारा ते मुंबई भव्य मंत्रालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. लोकप्रतिनिधी तसेच शासन व प्रशासन यांनी लोकप्रियतेसाठी शहराच्या उदात्तीकरणाला नेहमी प्राधान्य दिले. त्यामुळे ग्राम विकासाला खीळ बसली आहे. राज्यातील सरपंच यांच्या अनेक समस्या तसेच ग्रामपंचायतचे प्रश्न त्याचप्रमाणे ग्रामविकासाच्या असंख्य अडीअडचणी असून या बाबतीत धोरणात्मक बदल झाला नाही. अनेक मागण्यांसाठी अखेर सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यानाच रस्त्यावर उतरावे लागेल असा निर्णय सरपंच परीषदेच्या वतीने बैठकीत घेण्यात आला.

जिल्ह्यासह तालुक्यातील सर्व सरपंच, सदस्य, पदाधिकारी, यांनी मोठ्या संख्येने या धडक मोर्चात आंदोलनासाठी उपस्थित राहावे. असे आवाहन सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष आदिनाथ देशमुख, कविताताई घोडके पाटील व जिल्हा समन्वयक, गोगावच्या सरपंच सौ वनिता सुरवसे यांनी केले आहे.

# नुतन महिला रेल्वे पोलीस बिराजदार यांचा वागदरी येते सत्कार



वागदरी /एस.के.गायकवाड : वागदरी ता.तुळजापूर येथील सामान्य शेतकरी प्रकाश लक्ष्मण बिराजदार यांची कन्या राधिका प्रकाश बिराजदार ह्या घाटकोपर मुंबई येथे नुकतेच झालेल्या रेल्वे पोलीस भरतीत महिला रेल्वे पोलीस म्हणून भरती झाल्या बद्दल वागदरी ता.तुळजापूर येथे ग्राम पंचात व समस्थ ग्रामस्थांच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथील सामान्य शेतकरी कुटुंबातील राधिका प्रकाश बिराजदार यांनी जिद्दीने पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. नोकरीच्या शोधात आसतानाच नुकतेच ती बाहुल्यावर चढली होती. विवाह झाला तरी त्यांनी नोकरीचा प्रयत्न सोडला नाही.नुकतेच घाटकोपर मुंबई येथे झालेल्या रेल्वे पोलीस भरती प्रक्रियेत तिने सहभाग घेतला आणि महिला रेल्वे पोलीस म्हणून त्यांची निवड झाली.राधिका प्रकाश बिराजदार ह्या वागदरी सारख्या दुर्गम भागातील छोट्या गावातून महिला रेल्वे पोलीस म्हणून केंद्र शासनाच्या रेल्वे पोलीस सेवेत दाखल होणाऱ्या पहिल्या महिला आहेत. त्याबद्दल वागदरी ग्रामपंचायत व समस्थ ग्रामस्थांच्या वतीने ग्रा.प.सदस्य सुरेखा भालचंद्र यादव यांच्या हस्ते व उपसरपंच मीनाक्षी महादेव बिराजदार, ग्रा.प.सदस्य मुक्ताबाई विलास बिराजदार, गुनाबाई श्रीरंग बनसोडे, यांच्या प्रमुख उपस्थितीत यथोचित सत्कार करण्यात आला. या प्रसंगी जेष्ठ कार्यकर्ते तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजी मिटकर गुरुजी,माजी उपसरपंच दत्ता सुरवसे यांची शुभेच्छा पर भाषणे झाली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन एस.के.गायकवाड यांनी केले. यावेळी तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष राजेंद्र पाटील, उपाध्यक्ष फत्तेसिंगभाई ठाकुर, ह.भ.प.राजकुमार पाटील, ग्रा.प.सदस्य ज्ञानेश्वर पाटील, अमोल पवार, शालेय व्यवस्थापण समिती अध्यक्ष रामसिंग परिहार, सदन शेतकरी अनिल गोगावे, बालाजी बिराजदार,भालचंद्र यादव,अनिल वाघमारे, दिपक धुमाळ,उमेदच्या सिआरपी विद्या बिराजदार, गीताबाई झेंडारे सह महिला, ग्रामस्थ,युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टाकळीवाडी चे माजी सैनिक सुदर्शन शिरगुप्पे हे बनले मुंबई पोलीस

## सैनिक फेडरेशन तर्फे सत्कार



टाकळीवाडी/नामदेव निर्मळेः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील नुकतेच भारतीय सेना मध्ये १७ वर्षे देश सेवा करून सेवानिवृत्त झालेले टाकळीवाडी चे सुपुत्र सुदर्शन शिरगुप्पे यांची मुंबई पोलीस पदी निवड झाली आहे.नुकतेच १ एप्रिल ला सेवानिवृत्त झाले .भारतीय सेना मध्ये अतिशय चांगल्या कामगिरीने आपले कर्तव्य दाखवले. टाकळीवाडी चे नाव त्यांनी लौकिक केले आहे. वयाच्या १८ वर्षी त्यांनी भारतीय सेना मध्ये दाखल झाले होते.

सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. कश्मीर, बेळगाव, पुणे , कुपवाडा,आदी ठिकाणी त्यांनी आपली देशसेवा केली. टाकळीवाडीतील मुले कुठल्या क्षेत्रात कमी नाहीत हे त्यांनी सिद्ध केले आहे. सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. वडील बोलताना म्हणाले की माझा मुलगा अतिशय चांगली कामगिरी महाराष्ट्र पोलीस मध्ये करेल व गावचे नाव रोशन करेल.

यावेळी त्यांचा सत्कार करताना विद्यमान महात्मा गांधी तंटामुक्त अध्यक्ष माजी सुभेदार केंदबा कांबळे, ऑर्नरी कॅप्टन रमेश निर्मळे, दादा खोत, मनोहर कोळी, समीर आरकाटे, शंकर खोत, मोहन निर्मळे,सर्व माजी सैनिक , फेडरेशनचे सर्व आजी-माजी सैनिक यांनी सत्कार करून अभिनंदन केले.



# चेतना इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च तर्फे मुंबईतील उद्योजकांची एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

मुंबई : चेतना इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च च्या वांद्रे येथील प्रांगणात मुंबईतील उद्योजकांच्या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विविध स्थरातील उद्यजकांना उद्योग व्यवस्थापनाचे मार्गदर्शन करणे हे ह्या कार्यशाळेचा उद्देश होता. मुंबईतील तरुण उद्योजकांनी ह्या कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद दिला. त्यामुळेच चेतना इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च च्या कार्यकारिणीने असा निर्णय घेतला आहे कि अशा उद्योजकांच्या कार्यशाळांचे मालिका करून चडचए सेक्टर मधील उद्योगांना योग्य मार्गदर्शन सातत्याने मिळण्याची व्यवस्था करावी. ह्या कार्यशाळेसाठी चेतना इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च च्या उएज डॉ .मधुमिता पाटील, डायरेक्टर डॉ. नंदिता मिश्रा, डॉ. संदीप नेमळेकर, आदी प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. डॉ सिद्धी जगदाळे यांनी कार्यशाळेचे उत्तम आयोजन केले होते. विविध उद्योग चेंबर्सशी संबंधित असलेले श्री अरुण धनेश्वर यांनी कार्यशाळेत येणारे उद्योजक कशा प्रकारचे असावेत आणि त्यांना त्याचा कसा लाभ होईल ह्या कडे बारकाईने लक्ष दिले होतं.यामुळे सहभागी उद्योजकांनी या कार्यशाळेत मिळालेल्या मार्गदर्शनासाठी खूप प्रशंसा करून समाधान व्यक्त केले. तसेच यापुढील कार्यशाळेत आपल्या कर्मचाऱ्यांना पाठवण्याची तसेच विविध औद्योगिक समस्यांवर सल्ला घेण्याची इच्छा व्यक्त केली.

# न्यूयॉर्क मध्ये महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे संग्रहालय स्वरूपात स्मारक उभारण्यात यावे : ना.रामदास आठवले

मुंबई : भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे लंडन मध्ये जसे संग्रहालय स्वरूपात स्मारक उभारण्यात आले आहे तसेच अमेरिकेत न्यूयॉर्क मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनपट दर्शविणारे संग्रहालय म्युझियम स्वरूपात



भव्य स्मारक उभारावे अशी मागणी आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केली आहे. ना.रामदास आठवले हे अमेरिका दौऱ्यावर असुन आज त्यांनी न्यूयॉर्क मधील कोलंबिया विद्यापीठाला भेट देऊन कोलंबिया विद्यापीठातील लेहमन लायब्ररी मधील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला विनम्र अभिवादन केले. यावेळी ना.रामदास आठवले यांच्या समवेत त्यांच्या पत्नी सौ सीमाताई आठवले; पुत्र जित आठवले उपस्थित होते. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर कोलंबिया विद्यापीठात शिकले.येथील लेहमन लायब्ररी मध्ये महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर तासनतास अभ्यास करीत असत.कोलंबिया विद्यापठाने महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा ज्ञानाचे प्रतीक म्हणून गौरव केला असून त्यांचा पुतळा लेहमन लायब्ररी मध्ये उभारण्यात आला आहे. त्यामुळे न्यूयॉर्क मध्ये महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनपट दर्शविणारे भव्य म्युझियम स्वरूपात स्मारक उभारावे अशी मागणी ना.रामदास आठवले यांनी केली आहे. यासाठी आपण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना भेटून भारत सरकार तर्फे न्यूयॉर्क मध्ये महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारले जावे यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ना.रामदास आठवले यांनी कळविले आहे.



# चोराखळी येथील धाराशिव साखर कारखान्यात बायोगॅस प्रकल्प सुरू

## प्रति दिवस वीस हजार मे.टक बायोगॅस उत्पादन सुरू




धाराशिव : धाराशिव जिल्ह्यातील चोराखळी येथील धाराशिव साखर कारखान्यात बायोगॅस व सीएनजी चे उत्पादन सुरू झाले असल्याचे कारखान्याचे प्रमुख अभिजीत पाटील यांनी माहीती दिली... धाराशिव साखर कारखाना नेहमी चर्चेत आणि नवनवीन उपक्रम राबवून सामाजिक कार्यात पुढाकार घेणारा कारखाना म्हणून ओळख आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमध्ये इथेनॉल प्लांट बंद करून देशातील पहिला ऑक्सिजन प्रकल्प याच धाराशिव साखर कारखान्यामध्ये यशस्वी झाला होता आणि आता काळाची गरज ओळखून बायो-सीएनजी गॅसचे उत्पादन कारखाना प्रशासन घेत आहे याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

धाराशिव कारखान्यात डिसलेरी प्रकल्पातू स्पेंट वॉश पासून बायोगॅसची निर्मिती होत आहे.

एका दिवसाला बायोगॅस जवळपास २०हजार ाक उत्पादन घेऊन सीएनजी जवळपास १० मॅट्रिक टनाचा प्लांट सुरू करण्यात आला आहे. बॉयलरला बायोगॅस दिल्याने बगॅसची बचत होत आहे. त्यातूनच पुरक प्रदुषण मुक्त वातावरण निर्माण होत असल्याचे असे श्री.अभिजीत पाटील यांनी बोलताना सांगितले. यावेळी धाराशिव साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर पाटील, शिवसेनेचे नेते आतिश पाटील, पंढरपूर बार असोशिएशन अध्यक्ष ड. अर्जुन पाटील, कारखान्याचे जनरल मॅनेजर आयुबखान पठाण, इंजनिअर देशमुख, प्रविण बोबडे, बाबासाहेब वाडेकर, पेठे, दयानंद गव्हाणे, डिसलेरी मॅनेजर ज्ञानेश्वर कोळगे यांच्यासह सर्व खाते प्रमुख उपस्थित होते...

# प्रशासन आणि पदाधिकाऱ्यांच्या समन्वयातून सामान्य जनतेचे प्रश्न सोडवावे : राधाकृष्ण विखे पाटील




औरंगाबाद : सामान्य जनतेच्या कल्याणासाठी शासन अनेक योजनांची अंमलबजावणी करते. या योजनांचा लाभ देण्याबरोबरच प्रशासनातील अधिकारी आणि लोकप्रतिनीधी, पदाधिकारी यांनी समन्वयातून सामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्याचे आवाहन महसूल मंत्री विखे पाटील यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पदाधिकारी आणि अधिकारी यांच्या समन्वय बैठकीत ते बोलत होते. यावेळी केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, सहकारमंत्री अतुल सावे, आमदार हरिभाऊ बागडे, प्रशांत बंब, जिल्हाधिकारी अस्तिककुमार पाण्डेय, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, पोलीस अधिक्षक मनिष कलवानिया, शिरीष बोराळकर, संजय किनीकर तसेच विविध पदधिकारी उपस्थित होते.महसूल मंत्री म्हणाले शासकीय योजना सामन्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी तसेच त्यांच्या समस्या सोडण्यासाठी पदाधिकारी काम करत असतात. हे काम करत असताना प्रशासनातील अधिकाऱ्यांनी त्यांना मदत करणे आवश्यक आहे. पदाधिकारी आणि अधिकारी यांनी समन्वयाने काम केल्यास शासकीय योजना तळागाळातील सामान्य जनतेपर्यंत पोहचतील असेही ते म्हणाले.

शासन आपल्या दारी हे अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. विविध योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांनी तहसिलदार, गटविकास अधिकारी आणि संबंधित अधिकारी यांची बैठक घ्यावी असेही ते म्हणाले. यावेळी आमदार हरिभाऊ बागडे, प्रशांत बंब तसेच शिरीष बोराळकर, संजय किनीकर आणि इतर पदधिकाऱ्यांनी सूचना केल्या. त्या सूचनांची दखल घेऊन त्यावर तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश महसूल मंत्र्यांनी दिले.

# पोटनिवडणुकीत साठे विजयी

पंढरपूर/प्रतिनिधी : तालुक्यातील लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायतीच्या एका जागेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत शिंदे शिवसेनेच्या नागराबाई देविदास साठे या विजयी झाल्या. टाकळी ग्रामपंचायतीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे महेश साठे यांची सत्ता आहे. काही दिवसांपूर्वी पार पडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत महेश साठे यांनी दोन ठिकाणावरुन विजय मिळविला होता. यामुळे त्यांनी प्रभाग ४ येथील सदस्यपदाचा राजीनामा दिल्यामुळे या जागेसाठी निवडणूक लागली होती. यामध्ये नागराबाई साठे यांना ७०५, विरोधी संगीता अगस्ती देठे यांना ३५९ मते मिळाली. तर नऊ जाणांनी नोटाला मतदान केले. या विजयानंतर महेश साठे समर्थकांनी गुलाल उधळून व फटाक्यांची आतषबाजी करुन एकच जल्लोष केला. या विजयामुळे साठे यांच्या कुटुंबातील चार जण ग्रामपंचायत सदस्य झाले आहेत. महेश साठे यांनी लक्ष्मी टाकळी गावाच्या विकासासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून मोठा निधी आणणार असल्याचे सांगितले.

# मोहंम्मद अयाज सोलापूर झेडपीचे ब्रँड ॲम्बेसेडर

सोलापूर/प्रतिनिधीः केंद्र शासनाने व्यसनमुक्तीसाठी सोलापूर जिल्ह्याची निवड केली असून या अभियानासाठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून गायक मोहंम्मद अयाज यांची नियुक्ती केली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी अयाज यांना नियुक्तीचे पत्र दिले आहे. सोलापूर जिल्ह्यात हे अभियान यशस्वी करण्यासाठी अयाज यांनी आपल्या कलेच्या माध्यमातून जनजागृती करावी, अशी अपेक्षाही यावेळी स्वामी यांनी व्यक्त केली. आपल्याला मिळालेल्या या संधीचा उपयोग करून जिल्हा व्यसनमुक्त करण्यासाठी निश्चितपणे हातभार लावू, अशी ग्वाही यावेळी अयाज यांनी दिली. यावेळी राज्य समन्वयक अनुष्का शर्मा, समाजकल्याण अधिकारी सुनील खमितकर उपस्थित होते.

